नवगण शिक्षण संस्थेचे,

वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटोदा, जिल्हा. बीड.

सांस्कृतिक विभाग

शिक्षक दिनानिमित्त विशेष व्याख्यान

दिनांक 6 सप्टेंबर 2021

---

नवगण शिक्षण संस्थेचे, वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त दिनांक 6 सप्टेंबर 2021 रोजी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्याते म्हणून अमृतेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विंझर, जि. पुणे येथील डॉ. परमेश्वर गडकर हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वळीराम राख हे होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. किशोर मचाले, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नंदकुमार पटाईत, पर्यवेक्षक प्रा. रमेश टाकणखार उपस्थित होते.

या विशेष व्याख्यानामध्ये डॉ. गडकर यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांपुढील आव्हाने यासह शैक्षणिक धोरण अंगीकारत असताना शिक्षकांपुढे येणाऱ्या अडचणी यांचे विवेचन केले. शिक्षणाचे होत असलेले खाजगीकरण आणि विद्यार्थ्यांची शिक्षणाविषयीची बदलती मानसिकता लक्षात घेऊन शिक्षकांनी वाटचाल करायला हवी. शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी वेगवेगळ्या संधी निर्माण होत आहेत असेही त्यांनी मत व्यक्त केले.

कार्यक्रमाला वेगवेगळ्या महाविद्यालयातून बहुसंख्य प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. कुशाबा साळुंके यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. जयंत साठे यांनी केले.

प्राचार्य
**Principal**
Vasantdada Patil Arts, Comm. &
Science College, Patoda, Dist.Beed.